# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### दुखापत

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत मोहपा बुधवारपेठ ता. कळमेश्वर येथे दिनांक १२/११/२०२३ चे ०६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— संजिवनी पुरूषोत्तम खडतकर, वय ५६ वर्ष, रा. मोहपा बुधवार पेठ ता. कळमेश्वर ही अंगणात रांगोळी काढत असताना यातील आरोपी क्र. १) **नामे—** शंशीकांत जानराव रेवतकर हा तोंड धुवत रांगोळी जवळ आला तेव्हा तोंड धुत असलेले पाणी फिर्यादीच्या अंगावर उडले असता फिर्यादीने आरोपी क्र. १) यास हटकले असता आरोपी क्र. १) याने शिवीगाळ केली व आरोपी क्र. २) महिला आरोपी हिने वेळवाची काठी फिर्यादीच्या पाठीमागुन डोक्यावर मारले म्हणुन डोक्याला टेंगुंळ आले तसेच गालावर थापड मारली तेव्हा फिर्यादीच्या मुलाने मध्यस्ती करुन भांडण सोडवले. आरोपी क्र. १) व २) हयांनी पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपींविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार धनराज मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर फिर्यादीचे किराणा दुकान जुनी कामठी येथे दिनांक १२/११/२०२३ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— नागेश राजेष मराठे, वय २८ वर्ष रा. हरिहर नगर, कांद्री कन्हान जि. नागपुर यांचे चप्पलचे दुकान असुन ते ७ महीण्यापासुन राजेंद्र मेडीकल स्टोर्स समोर आपले दुकान लावत आहे. फिर्यादीने आपले दुकान लावले असता यातील आरोपीं नामे— १) राजेश नामदेव हटवार वय ५५ वर्ष २) त्याचा मुलगा (नाव माहीत नाही) वय अंदाजे २५ वर्ष दोन्ही रा. रामनगर कन्हान यांनी फिर्यादीस तु यहॉपर दुकान मत लगा यहॉ से दुकान हटा असे म्हणुन फिर्यादीचे कॉलर पकडले व शिवीगाळी करून आरोपीच्या हातात असलेले दुकान खोलण्याचे लोखंडी शटर हॅन्डलने फिर्यादीचे चेहऱ्यावर मारले त्यामुळे फिर्यादीचे ओठावर लागुन जखम झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपींविरुध्द कलम ३२४, ५०४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर